स. फौजदारी खटला क्र. ३८०/२०२४
सरकार विरूद्ध दिनकर
**निशाणी ०९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी**
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : दिपक काशिनाथ रहाटे,
वय : ५२ वर्षे,
धंदा : शेती काम,
राहणार : वडेगांव, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी फिर्यादीला ओळखत नाही. मला पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी बोलाविले नव्हते. शेतातून येतांना पंचनाम्यावर सही केली होती. आता मला पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. मला त्यातील मजकूर माहिती नाही.

(***साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली***.)

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४/१२/२०२३ रोजी अकोट अकोला रोडवर दिप गावंडे यांच्या शेता जवळ पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी पोलीसांनी माझे समक्ष पंचनामा तयार केला व तो वाचून मी त्याठिकाणी सही केली. मी गजानन मेतकर नावाच्या व्यक्तीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०४/१२/२०२३ रोजी अकोट अकोला रोडवर दिप गावंडे यांच्या शेता जवळ पोलीसांनी मला आवाज दिला व माझी सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, मी को—या कागदावर सह्या करत नाही. मला मराठी वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याचा कागद वाचला व त्यानंतर त्यावर

P.T.O

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK060009022024-orderno-2.pdf
www.ecourtsindia.com

सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकूर खरा असल्यामुळे मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मला न्यायालयात शपथेवर साक्ष देण्याचे महत्त्व कळते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी** — आरोपीने स्वतः नाकारली.

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. २८.०४.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोट
ता. आकोट, जि. अकोला.

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK060009022024-orderno-2.pdf

www.ecourtsindia.com

www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com www.ecourtsindia.com



**SCC No. 380/2024**
**Evidence/Exh. 09**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file Evidence is same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 28/04/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 28/04/2025. |
| Evidence Uploaded on | : | 29/04/2025. |

This is a True Copy of the Court Records Online. Proofed @ eCourtsIndia.com/TrueCopy/MHAK060009022024-orderno-2.pdf